**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ६१/२०१६-१७/१३२ दिनांक: ०७.०४.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ६१/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. दत्तू भागोजी पाटील :<br>मु. पो. सोनुर्ले<br>ता. शाहूवाडी, जिल्हा. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग पन्हाळा | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री  दत्तू भागोजी पाटील, रा.सोनुर्ले ता.शाहूवाडी जि. कोल्हापूर यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंपासाठी नविन वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी   दिनांक १८-०२-२०१७ रोजी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

२) तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि. २०.०१.२०१७ च्या आदेशाने जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत यावी असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

३) तक्रारदार यांनी वरील प्रमाणे अर्ज दि. ०२-०६-२०१५ रोजी दाखल करुन दि. २७-०१-२०१५ रोजी रक्कम भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे. तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी ०.२४ कि.मी. उच्च दाब वाहिनी ०.९० कि.मी लघुदाब वाहिनी आणि १०० के.व्ही.ए. रोहित्राची आवश्यकता आहे. सदर कामास इन्फ्रास्ट्रक्चर लागत असून तक्रारदाराचे नाव पन्हाळा उपविभागीय कार्यालयाच्या प्रतिक्षा यादीत नोंद केले आहे.नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

४) या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६-०४-२०१७ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते. वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री नितीन गिते, व अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री डी.जी. कुंभार, हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी  नवीन  वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

६) नविन वीज जोडणी लौकरात लौकर मिळावी एवढीच विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. त्यांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाइी वर परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उच्च व लघुदाब वाहिनीचा विस्तार आणि रोहित्र ही कामे करावी लागणार आहेत. नविन उपकेंद्र उभारणेची गरज नाही. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

७) विशिष्ट मुदतीत वीज पुरवठा देणे कायद्याने वि.प. यांचेवर बंधनकारक आहे. तसे न केल्यास विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) मध्ये दंडात्मक तरतूद केली आहे. कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही.

८) या केसमध्ये तक्रारदार यांनी लेखी अगर तोंडी अन्य कोणतीही मागणी या मंचासमोर केलेली नाही. शेवटी खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेती पंपासाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. ३०.०६.२०१७ पर्यन्त देऊन वीज पुरवठरा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |